**Shri Vile Parle Kelavani Mandal's**
# NARSEE MONJEE COLLEGE OF COMMERCE AND ECONOMICS
**(Empowered Autonomous)**
Vile Parle (West), Mumbai-400 056

2nd May, 2026.

## NOTICE

## Junior College

### TO APPLY FOR VERIFICATION/ PHOTOCOPY/ REVALUATION OF H.S.C. EXAMINATION FEB./MARCH-2026.

Students, who wish to apply for verification of marks, photocopies of answer sheets, and revaluation (for any specific subject except grade subjects) can apply through the online website https://mahahsscboard.in

- Applications for **verification of marks and photocopies of answer sheets** can be submitted online from **Sunday, 03/05/2026 to Sunday, 17/05/2026.**
- For applying for **revaluation of answer sheets** of the February–March 2026 examination, it is mandatory to **first obtain a photocopy** of the answer sheet online from the official website. **Within five working days from the date of receiving the photocopy**, students must apply online to the concerned divisional board in the prescribed format with the prescribed fee, following the revaluation procedure.
- Students who pass the February–March 2026 Higher Secondary Certificate Examination passing in all subjects will be eligible for **three subsequent opportunities** under the **Class Improvement Scheme** (June–July 2026, February–March 2027, and June–July 2027). A separate circular will be issued regarding the schedule for filling online application form for the same.
- The prescribed fees for verification of marks, photocopies of answer sheets, and revaluation can be paid online via Debit Card / Credit Card / UPI / Net Banking.

**Note:** The revaluation form is attached to this notice.

**Steps to apply:**
Step 1: Login to https://mahahsscboard.in
Step 2 : Go to student login
Step 3: Go to Verification/Photocopy/Revaluation
Step 4: Select **Verification of HSC marks**
Step 5: Create an account and proceed

Dr. Parag Ajagaonkar
Principal

# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे ४११००४.

# प्रकटन

**विषय : उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षा फेब्रुवारी-मार्च २०२६ च्या निकालाबाबत**

मंडळामार्फत **फेब्रुवारी-मार्च २०२६ मध्ये** आयोजित करण्यात आलेल्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षेचा निकाल मंडळाच्या विहित कार्यपध्दतीनुसार जाहीर करण्यात येत आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर व कोकण या नऊ विभागीय मंडळांमार्फत फेब्रुवारी-मार्च २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षेचा निकाल खालील अधिकृत संकेतस्थळांवर शनिवार दिनांक ०२ मे, २०२६ रोजी दुपारी ०१.०० वाजता ऑनलाईन जाहीर करण्यात येत आहे. अधिकृत संकेतस्थळांचे पत्ते खालीलप्रमाणे आहेत.

1. https://results.digilocker.gov.in
2. https://mahahsscboard.in
3. https://hscresult.mkcl.org
4. https://results.targetpublications.org
5. https://results.navneet.com
6. https://www.tv9marathi.com
7. https://education.indianexpress.com/boards-exam/maharashtra-hsc-12-results.

परीक्षेस प्रविष्ट झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे विषयनिहाय संपादित केलेले गुण उपरोक्त संकेतस्थळांवर उपलब्ध होतील व सदर माहितीची प्रत (प्रिंट आऊट) घेता येईल. त्याचप्रमाणे Digilocker App मध्ये Digital गुणपत्रिका संग्रहित करून ठेवण्याची सोय उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

तसेच https://mahahsscboard.in ( in college login ) या संकेतस्थळावर कनिष्ठ महाविद्यालयांना त्यांच्या कनिष्ठ महाविद्यालयाचा एकत्रित निकाल उपलब्ध होईल.

## सदर निकालाबाबतचा अन्य तपशील खालीलप्रमाणे -

१) ऑनलाईन निकालानंतर उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षेस प्रविष्ट झालेल्या विद्यार्थ्यास स्वत:च्या अनिवार्य विषयांपैकी (श्रेणी विषयांव्यतिरिक्त) कोणत्याही विशिष्ट विषयात त्याने संपादित केलेल्या गुणांची गुणपडताळणी व उत्तरपत्रिकांच्या छायाप्रती, पुनर्मूल्यांकनासाठी संबंधित विभागीय मंडळाकडे ऑनलाईन पध्दतीने मंडळाच्या अधिकृत संकेतस्थळ https://mahahsscboard.in वरुन स्वत: किंवा कनिष्ठ महाविद्यालयामार्फत अर्ज करण्याची सोय उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. यासाठी आवश्यक अटी/शर्ती व सूचना संकेतस्थळावर देण्यात आलेल्या आहेत.

गुणपडताळणीसाठी व उत्तरपत्रिकांच्या **छायाप्रतीसाठी रविवार दिनांक ०३/०५/ २०२६ ते रविवार दिनांक १७/०५/२०२६ पर्यंत अर्ज ऑनलाईन पध्दतीने करता येईल.** त्यासोबतच ऑनलाईन पध्दतीने शुल्क Debit Card/ Credit Card/ UPI/ Net Banking याद्वारे भरता येईल.

२) **फेब्रुवारी-मार्च २०२६** च्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षेच्या उत्तरपत्रिकेचे पुनर्मूल्यांकनासाठी ऑनलाईन पध्दतीने अर्ज मंडळाच्या अधिकृत संकेतस्थळावरुन करण्यासाठी प्रथम उत्तरपत्रिकेची छायाप्रत घेणे अनिवार्य आहे. छायाप्रत मिळाल्याच्या दिवसापासून कार्यालयीन कामाच्या पाच दिवसांत पुनर्मूल्यांकनाच्या कार्यपध्दतीचा अवलंब करुन विहित नमुन्यात विहित शुल्क भरुन संबंधित विभागीय मंडळाकडे विद्यार्थ्यांनी ऑनलाईन पध्दतीने अर्ज करणे आवश्यक राहील. ज्या विद्यार्थ्यांना उत्तरपत्रिकेचे पुनर्मूल्यांकन करावयाचे असेल त्यांनी अधिक माहितीसाठी संबंधित विभागीय मंडळाकडे संपर्क साधावा.

३) **फेब्रुवारी-मार्च २०२६** च्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र **(इ.१२ वी)** परीक्षेत सर्व विषयांसह प्रविष्ट होऊन उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी लगतच्या तीन संधी **(जून-जुलै २०२६, फेब्रुवारी-मार्च २०२७ व जून -जुलै २०२७) श्रेणी/गुणसुधार (Class Improvement Scheme)** योजनेअंतर्गत उपलब्ध राहतील.

४) जून-जुलै २०२६ मध्ये आयोजित करण्यात येणाऱ्या पुरवणी परीक्षेसाठी पुनर्परिक्षार्थी, श्रेणीसुधार व खाजगीरित्या प्रविष्ट होणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी मंडळाच्या संकेतस्थळावरुन ऑनलाईन पध्दतीने आवेदनपत्रे भरुन घेण्याच्या तारखांचे परिपत्रक स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येईल.

दिनांकः ३०/०४/२०२६

Mali

(डॉ. दिपक माळी )
**सचिव**
**राज्य मंडळ, पुणे-०४**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ

------------- विभागीय मंडळ---------------

उत्तरपत्रिकेचे पुनर्मुल्याकंनाबाबतचा अभिप्राय

जुलै - ऑगस्ट

माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा फेब्रु-मार्च/ सप्टें - ऑक्टोंबर -२०--

विषय :----------------------- दिनांक :- / /२०

मी (शिक्षकाचे पूर्ण नाव) ------------------------ शाळा/कनिष्ठ महाविद्यालयात --------- या पदावर कार्यरत असून इ.१०वी/इ.१२वी ला ----------- हा विषय शिकवित आहे.

अर्जदार विद्यार्थी हा आमच्या शाळेतील असून तो उच्च माध्यमिक/माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षेस फेब्रु/मार्च ----- प्रविष्ठ झाला होता. सदर विद्यार्थ्याने मंडळाकडून उत्तरपत्रिकेची छायाकिंत प्रत घेतल्यानंतर पुनर्मुल्याकंन करण्याबाबतचा अर्ज केलेला आहे. त्यानुसार सदर विद्यार्थ्याचे उत्तरपत्रिकेच्या छायाकिंत प्रतीची मी नमुना उत्तरांच्या आधारे पुनश्च: तपासणी केलेली असून मला खालील प्रश्नात कमी गुणदान झाल्याचे आढळून येते. / गुणदान योग्य झाल्याचे आढळून येते. गुणदान कमी झाल्याबाबत मी खालीलप्रमाणे सकारण अभिप्राय देत आहे.

-----------------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------------

शिक्षकाची स्वाक्षरी

मुख्याध्यापकाची स्वाक्षरी

(शाळेचा शिक्का)